# ई - पोलीस पत्रिका

दि २७/१२/२०२२ अनु.क्र. २३८

## (अमरावती शहर पोलीसांची २०२२ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

**भाग-१**

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

**१. पोआअ/विचौ-१/विचौ-१/गै.कसुरी/अ.आ./पोनि-वाकसे/१४८०८ /२०२२ अमरावती शहर दिनांक १३/१२/२०२२**

## आदेश

**कसुरदाराचे नाव :-** पोनि विजय कुमार वाकसे तत्का. नेमणूक - पो. स्टे. वलगांव
सध्या नेमणूक - पोलीस नियंत्रण कक्ष, अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही विजय कुमार वाकसे पोलीस निरीक्षक, पो.स्टे.वलगांव येथे नेमणूकीस असतांना पो.स्टे. वलगांव येथील पोलीस उपनिरीक्षक अयुब हिराजी शेख व त्यांचे रायटर यांनी फिर्यादी अमित अरुण उल्हे वय ३८ रा. सहकार नगर, नविन कॉटन मार्केट समोर, अमरावती यांना त्यांचे मित्र मिलींद चौधरी वय ३८ वर्ष, रा. हर्षराज कॉलनी, कॅनरा बॅक मागे, व्ही.एम.व्ही. रोड, अमरावती यांचेवर बनावट खत विक्री प्रकरणी दाखल गुन्हयामध्ये फिर्यादी यांना आरोपी न करण्यासाठी ६०,०००/- रुपये लाचेची मागणी करत असल्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती येथे तक्रार प्राप्त झाली. सदर तक्रारीवरुन दिनांक ०३/०८/२०२२ रोजी करण्यांत आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान आरोपी अयुब हिराजी शेख पोउपनि पो.स्टे. वलगांव, अम. शहर यांनी फिर्यादी यांना पंचासमक्ष बनावट खत विक्री प्रकरणी दाखल गुन्हयामध्ये आरोपी न करण्यासाठी खाजगी इसम श्री मिलींद दादाराव चौधरी व मकसूद अली कादर अली वय ३९ वर्षे रा. सौदागर पुरा, वलगांव जि. अमरावती यांचे मार्फतीने स्वत:साठी ५०,०००/- रुपये व मकसूद अली यांच्या करीता ५,०००/- रु. असे एकूण ५५,०००/- रुपये लाचेची मागणी केली. आरोपी अयुब शेख पोउपनि पो.स्टे. वलगांव, यांनी मिलींद चौधरी व मकसूद अली यांच्या मार्फतीने लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. व दिनांक ०४/०८/२०२२ रोजी सापळा आयोजित कार्यवाही दरम्यान सदर लाचेची रक्कम ५५,०००/-रु. खाजगी इसम मिलींद चौधरी यांनी पोलीस अधिकारी अयुब शेख यांच्या करीता हेरीटेज किचन हॉटेल जवळ, व्ही.एम.व्ही. रोड, अमरावती येथे पंचासमक्ष स्विकारली. आरोपी मिलींद चौधरी यास रंगेहात पकडण्यांत आले आहे. यामुळे यातील वर नमुद तीनही आरोपीतां विरुध्द पो.स्टे. गाडगेनगर येथे अप.क्र. ८८१/२०२२ कलम ७, ७अ, १२ भ्रष्ट्राचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यांत आला.

सदर गुन्हयाच्या कारणांचे अवलोकन केले असता पो.स्टे. वलगांव येथे फिर्यादी अश्विन मांगीलाल चव्हाण व्यवसाय नोकरी (खत निरीक्षक तथा कृषी अधिकारी) अमरावती यांचे तक्रारीवरुन अप.क्र. २००/२०२२ कलम ३,५,७,८,१९ रा.ख.(नियंत्रण) आदेश १९८५ सहकलम ४२०, ३४ भादवी कलम ३,७ अत्यावश्यक वस्तू कायदा याप्रमाणे आरोपी मिलींद बाबाराव वानखडे यांचे विरुध्द गुन्हा दिनांक २१/०६/२०२२ रोजी १०.५४ वा. दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास तुम्ही पोउपनि अयुब शेख यांचेकडे दिनांक २१/०६/२०२२ रोजी दिल्याचे व त्यांनी तो दिनांक २२/०६/२०२२ रोजी स्विकारल्याचे गुन्हयाचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. सदर गुन्हा दाखल झाल्यापासून तुम्ही पोउपनि अयुब शेख यांना गुन्हयाच्या तपासाबाबत लेखी सुचना दिल्याचे गुन्हयाचे कागदपत्रे व केसडायरी याचेवरुन दिसून येत नाही.

तसेच तुम्ही गुन्हयांचे कागदपत्रे व केसडायरी पाहून तपास अधिकारी यांना तपासाबाबत मार्गदर्शन केल्याचे देखील दिसून येत नाही. तसेच सदर गुन्हयांची केसडायरी क्र. १ ते २० अवलोकन करुन त्यावर प्रभारी अधिकारी म्हणून तुम्ही स्वाक्षरी केलेली नाही.

अशाप्रकारे तुमचे तुमच्या अधिपत्याखालील अधिकारी यांचे कामकाजावर नियंत्रण व देखरेख प्रभावी नसल्याचे दिसून येते अशा प्रकारे तुम्ही पो.स्टे. वलगांव येथे प्रभारी पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असतांना तुमच्या अधिनस्त अधिकारी यांचेवर नियंत्रण ठेवण्याचे कर्तव्यात निष्काळजीपणा व बेजबाबदारपणा केल्याचे कसूरीबाबत देय वार्षीक वेतन वाढ १ (एक) वर्षाकरीता (अपरिणामकारक) का ? रोखण्यात येवु नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदरची नोटीस तुम्ही दिनांक २५/०८/२०२२ रोजी स्विकारुन त्यावर आपले स्पष्टीकरण सादर केले. तुम्ही सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे सखोल अवलोकन केले असता ते संयुक्तीक व समाधानकारक दिसून आले नाही. करीता तुम्हास कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेली शिक्षा कायम ठेवण्यात येवून खालील शिक्षेचे अंतीम आदेश पारीत करण्यांत येत आहे.

## अंतिम आदेश

उपरोक्त कसुरी प्रकरणी मी डॉ.आरती सिंह पोलीस आयुक्त, अमरावती शहर सक्षम अधिकारी याव्दारे पो.नि. विजय कुमार वाकसे, नेमणुक पो.स्टे. वलगाव सध्या नेमणूक, पोलीस नियंत्रण कक्ष, अमरावती शहर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार **देय वार्षीक वेतन वाढ १ (एक) वर्षाकरीता** (अपरिणामकारक) शिक्षेबाबतचे अंतीम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा. अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना यथायोग्य मार्फतीने अपिल अर्ज सादर करु शकता.

**२. पोआअ/विचौ-२/कसुरी/गैरहजरी/पोशि-१७८४ चव्हाण/१४८५५ /२०२२ अमरावती शहर**
**दिनांक १५/१२/२०२२**

## आदेश

पोशि/१७८४ सागर चव्हाण नेमणुक जलद प्रतिसाद पथक, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन दि.१६/०८/२०२२ रोजी १६.३० वा पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे वेपन सरावा करीता येणे अपेक्षित होते. परंतु वेपन सरावा करीता उशिरा १७.३५ वाजता उशीरा हजर झाले. कर्तव्यात निष्काळजीपणा बेजबाबदारपणा केला असल्याने या कसुरी करीता मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उपनियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"** ही शिक्षा देण्यात येत आहे.

**३. पोआअ/विचौ-२/गैरहजर कालावधी//पु.स.का.-खंडारे/१५२१३/२०२२ अमरावती शहर दि.२२/१२/२०२२**

## आदेश

खालील नमुद पुर्णकालीन सफाई कामगार, नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांनी त्यांच्या कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता स्वमर्जीने कर्तव्यावरुन गैरहजर राहिले असल्याचे निदर्शनास आले असुन कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहुन बेशिस्तपणाची गैरवर्तणुक केली असल्याने सदरचा गैरहजर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ५० चे तरतुदीनुसार **अर्जित रजेमध्ये** मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पुर्णकालीन सफाई कामगार श्री. नरेश खंडारे | पो.मुख्या. अम.शहर | दिनांक ०१/११/२०२२ ते दिनांक २९/११/२०२२ पर्यंत वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले होते. | दिनांक ०१/११/२०२२ ते दिनांक २९/११/२०२२ पर्यंत एकुण ०२९ दिवस गैरहजर. | **२९ दिवस अर्जित रजा** |

**४. पोआअ/पशा-३/अर्जित रजा मंजुरी/१५१८१ /२०२२ अमरावती शहर दि.२७/१२/२०२२**

## -: आदेश :-

अमरावती शहर या पोलीस घटकातील खालील नमुद मंत्रालयीन कर्मचारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधीत **अर्जीत रजा मंजुर** करण्यात येत आहे.

| अ. क्र | नाव व पदनाम | नेमणुकीचे | अर्जीत रजा कालावधी | अतिरीक्त कार्यभार |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती संगीता वासणीक कश्रेलि | लेखा शाखा | दि.२८/१२/२०२२ रोजी ०१ दिवस | श्री.सचिन राजुरकर, कश्रेलि, लेखा शाखा |

**५. पोआअ/आस्था-वेनिलि/संगणक सादर वे.वा./१५०११ /२०२२ अमरावती शहर दि.२२/१२/२०२२**

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरील ज्या पोलीस अंमलदार यांनी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केले नाही. अशा पोलीस अंमलदार यांची शासन अधिसुचना, सामान्य प्रशासन विभाग दि.२८.०५.२०१८ अन्वये जानेवारी-२०२२ पासून वार्षिक वेतनवाढ स्थगित करण्यात आलेली होती. खालील नमुद पोलीस अंमलदार यांनी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केल्याने त्यांना शासन अधिसुचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.-२७/सेवा-९, दि.२२.०४.२०१९ मधील नियम १० अन्वये व शासन अधिसुचना वित्त विभाग, क्र.वेपुर २०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दि.३०.०१.२०१९ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा सुधारीत नियम-

२०१९ मधील नियम १०(२) अन्वये त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे वार्षिक वेतनवाढ मंजूर करण्यात येत आहे.

**१. पोलीस शिपाई/१३, प्रविण बळीरामजी सावळे, नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर**

| वेतनवाढीचा दिनांक | वेतनस्तरानुसार अनुज्ञेय वेतनवाढ |
|---|---|
| ०१.०१.२०२१ | रु.२५२००/- एस-७ |
| ०१.०१.२०२२ | रु.२५२००/- एस-७<br>शासन अधिसुचना, सा.प्र.वि. दि.१८.०५.२०१८ अन्वये संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर न केल्याने वेतनवाढ देय नाही.<br>**(काल्पनिक रु.२६०००/- एस-७)** |
| १९.१२.२०२२ | रु.२६०००/- एस-७<br>शासन अधिसुचना, सा.प्र.वि. दि.१८.०५.२०१८ अन्वये संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण केल्याने प्रत्यक्ष देय वेतन. |

शासन अधिसुचना, सामान्य प्रशासन विभाग, दि.१८.०५.२०१८ अन्वये उपरोक्त पोलीस अंमलदार यांना वेतनवाढीचा प्रत्यक्ष लाभ त्यांनी संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण केल्याच्या दिनांकापासून प्रत्यक्ष देय राहील. त्यादरम्यानची थकबाकी त्यांना देय राहणार नाही.

**६. पोआअ/आस्था-वेनिलि/आंजिब हजर/वे.नि./१४९९३ /२०२२ अमरावती शहर दि.२१/१२/२०२२**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार हे नमुद पोलीस घटकातुन या कार्यालयाच्या आस्थापनेवर सपोउपनि/पोहवा/पोना/पोशि या पदावरुन पोलीस शिपाई या पदावर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास विनंतीने आंतरजिल्हा बदलीवर हजर झालेले आहेत.

त्याअनुषंगाने त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३६ व ३९ मधील तरतुदीच्या अधिन राहून व शासन अधिसुचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र./सेवा-९, दि.३०.०१.२०१९ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे सुधारीत वेतनवाढी मंजूर करण्यात येत आहे.

**१. पोशि/६७७, प्रविण भिमराव पुणोते, नेमणुक पो.स्टे. नागपुरी गेट ,अमरावती शहर.**

| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतन | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतन |
|---|---|---|---|
| ०१.०७.२०२१ | रु.३२३००/- एस-८<br>**पोलीस शिपाई** | ०१.०७.२०२१ | रु.३२३००/- एस-८<br>**पोलीस शिपाई** |
| -- | -- | ११.०२.२०२२ | **रु.३२३००/- एस-८<br>पश्चिम प्रादेशीक विभाग,मुंबई येथुन पोलीस शिपाई या पदावरून पोलीस शिपाई या पदावर विनंतीवरून आंतरजिल्हा बदलीवर या आस्थापनेवर हजर झाले आहे परंतु त्यांना सु.आ.प्र.योजने अंतर्गत कालबद्ध** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **पदोन्नतीचा पहीला लाभ मिळाला असल्याने एस-८ मधील वेतन अनुज्ञेय.** |
| -- | -- | ०१.०७.२०२२ | रु.३३३००/- एस-८ |

**२. पोशि/७४५, संदीप रामदास निकम, नेमणुक पो.स्टे. भातकुली ,अमरावती शहर.**

| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतन | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतन |
|---|---|---|---|
| ०१.०७.२०२१ | रु.३२३००/- एस-८<br>**पोलीस शिपाई** | ०१.०७.२०२१ | रु.३२३००/- एस-८<br>**पोलीस शिपाई** |
| -- | -- | १०.०२.२०२२ | **रु.३२३००/- एस-८<br>पश्चिम प्रादेशीक विभाग,मुंबई येथुन पोलीस शिपाई या पदावरून पोलीस शिपाई या पदावर विनंतीवरून आंतरजिल्हा बदलीवर या आस्थापनेवर हजर झाले आहे परंतु त्यांना सु.आ.प्र.योजने अंतर्गत कालबद्ध पदोन्नतीचा पहीला लाभ मिळाला असल्याने एस-८ मधील वेतन अनुज्ञेय.** |
| -- | -- | ०१.०७.२०२२ | रु.३३३००/- एस-८ |

**३. पोशि/११५४, विजय प्रभाकर खोडे, नेमणुक दंगा नियंत्रण पथक ,अमरावती शहर.**

| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतन | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतन |
|---|---|---|---|
| ०१.०७.२०२१ | रु.३४३००/- एस-८<br>**पोलीस नाईक** | ०१.०७.२०२१ | रु.३४३००/- एस-८<br>**पोलीस नाईक** |
| -- | -- | ०९.११.२०२१ | **रु.३४३००/- एस-८<br>पो.अ.अमरावती ग्रामीण येथुन पोलीस नाईक या पदावरून पोलीस शिपाई या पदावर विनंतीवरून आंतरजिल्हा बदलीवर या आस्थापनेवर हजर झाले आहे परंतु त्यांना सु.आ.प्र.योजने अंतर्गत कालबद्ध पदोन्नतीचा पहीला लाभ पोना पदोन्नती पुर्वी मिळाल्याने एस-८ मधील वेतन अनुज्ञेय.** |
| -- | -- | ०१.०७.२०२२ | रु.३५३००/- एस-८ |

**(किशोर शेंडे)**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहर करीता

प्रति,

पत्रव्यहार शाखा / सेवापट नोंदणी लिपीक / सीसीटीएनएस